# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. हिंदुराव वसंतपुरी गोसावी,<br>मु.पो. केर्ले, ता. करवीर, जि. कोल्हापूर | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण १ विभागीय कार्यालय, कोल्हापूर | विरूध्द पक्षकार |

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, कदमवाडी, जि. कोल्हापूर

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. हिंदुराव वसंतपुरी गोसावी व इतर दोघे रा. केर्ले, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी घरगुती वीज कनेक्शनसाठी दि. १५.५.२००९ रोजी अर्ज केला असून त्यांनी दि. २५.६.२००९ रोजी रु. २००/– महावितरणकडे भरले. परंतु त्यांना दि. २५.७.२००९ पर्यंत कनेक्शन न मिळाल्यामुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दि. २८.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. त्यानुसार दि. १८.२.२०१० रोजी कक्षाकडे सुनावणी होऊन दि. २५.३.२०१० रोजी निर्णय दिला.

कक्षाचा निर्णय मान्य न झाल्यामुळे तक्रारदाराने ‘ अ ‘ फॉर्ममध्ये मंचाकडे दि. २५.५.२०१० रोजी अपील दाखल केले. तक्रारीत नवीन वीज जोडणी तात्काळ मिळून दि. २४.६.२००९ पासून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली.

दि. २८.६.२०१० रोजी सदर तक्रारीची मंचापुढे सुनावणी झाली. तक्रारदार स्वत: हजर. वि.प.तर्फे श्री. टी.पी. सुपेकर, सहाय्यक अभियंता, कदमवाडी उप विभाग, श्री. एम.डी. आवळेकर, उप कार्यकारी अभियंता हजर. वि.प.तर्फे रु. २००/– सुपरव्हिजन चार्जेस घेतल्याचे मान्य केले. तक्रारदार मागासवर्गीय असल्याचे सांगून त्याबाबत कोणताही पुरावा अर्जासोबत सादर केला नसल्याचे सांगितले व तसेच सुरक्षा ठेव भरली नसल्याचे सांगितले. तक्रारदाराने सुनावणीच्यावेळी सुरक्षा ठेव रु. ५००/– भरुन व टेस्ट रिपोर्ट देऊन कनेक्शन घेण्याचे मान्य केले. सोबत जातीचा दाखला देण्याचे मान्य केले. त्यानुसार श्री. सुपेकर, सहाय्यक अभियंता, कदमवाडी यांनी त्यांचे पत्र क्र. १८७८ दि. १३.८.२०१० अन्वये वीज पुरवठा दि. ९.८.२०१० रोजी दिल्याचे मंचास कळविले.

त्यामुळे खालील आदेश देत आहोत.

## आदेश

१) तक्रारदार यांस महावितरणने कनेक्शन दिल्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) भरपाई बाबत आदेश नाही.

३) सुपरव्हिजन चार्जेसपोटी भरलेले रु. २००/– रोखीने परत करावेत.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष